FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154137

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र ,जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि, पहिली खबर क्र. २९, वर्ष २०२१, दिनांक २४/०६/२०२१
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि.१९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार ............, तारीख पासून ५/०४/२०२१ वेळ ............, तारीख पर्यंत २४/०६/२०२१, वेळ ............
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ०५/०४/२०२१, वेळ ............
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. १९/२०२१, तारीख २४/०६/२१ वेळ १८.३०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव (एल वार्ड, मनपा कार्यालय अंतर्गत साकीनाका मनपा चौकी मुंबई), ठिकाणाचे नंबर ............, गल्ली ............, रस्त्याचे नाव ............
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, तालुका ............, जिल्हा............, राज्य ............
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका ............, जिल्हा............, राज्य ............
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव छट्टु रामाश्रय शर्मा (b) वडिलांचे / पतीचे नाव रामाश्रय बरखंडी शर्मा
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ४५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८१०८६५१२९१
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ............, दिल्याचा दिनांक ............ दिल्याचे ठिकाण ............ (f) व्यवसाय ............
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिन्दू, जात Caste न्हावी, जनजात Sub-Caste ............
(h) पत्ता रुम नं २२, शिवगर्जना चाळ, अशोकनगर, एम.टी.एन.एल. च्या मागे, कुर्ला, मुंबई
गल्ली / सर्व्हे नं. ............ घर / नाव नं. ............ फोन / मो. नं. ............ पॅन नं. ............ ओळख नं. ............
Address Ward House/Name No. Phone/Mb. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ............, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ............, गाव ............, पोस्ट............ पो. स्टे. ............
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ............, जिल्हा............ राज्य ............ सध्याचा पत्ता ............
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री. परब (पूर्ण नाव माहित नाही) लिपिक.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

सदर तक्रारीत फिर्यादि म्हणुन संबोधण्यात येत आहे.

(राहुल कारभारी.)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

फिर्याद २४/०६/२०२१

श्री. छट्टु रामाश्रय शर्मा वय ४३वर्षे, धंदा–नोकरी, रा.ठि. रुम नं.२२, शिवगर्जना चाळ, अशोक नगर, कुर्ला साकीनाका पाईपलाईन एम.टी.एन.एल.चे मागे, साकीविहार रोड, कुर्ला मुंबई–४०००७२, मो.नं. – ८१०८६५१२९१

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियांसह सन १९९४ पासून रहावयास आहे. मी अशोक गॅस एजन्सी, चोपडा गॅरेज जवळ, तुंगा गाव, पवई, मुंबई येथील भारत गॅस सिलेंडर घरोघरी जावुन पोंहचविण्याचे काम करतो व त्यावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

वरील माझी झोपडी क्रमांक टी/१९५६(मनपा क्रमांक) ही कुर्ला साकीनाका पाईप लाईनवर होती. सदर ठिकाणी मी सन १९९४ पासून रहात असल्याने माझ्या झोपडीचे मी पक्के बांधकाम केले होते. मी राहत असलेले झोपडे अतिक्रमण मध्ये येत असल्याचे कारण सांगुन बृहन्मुंबई मनपा एल विभागाने आम्हास निष्कासन कार्यवाहीची नोटीस दिली होती. अतिक्रमण कारवाई दरम्यान नष्ट करण्यात आलेल्या झोपडयांच्या बदल्यात, बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून पात्र झोपडी धारकांना नवीन फ्लॅटचे वाटप करण्यात येणार असल्याचे सांगीतले होते. त्याप्रमाणे माझी झोपडी पात्र करण्याकरीता व मला राहणेकरीता नवीन फ्लॅट मिळावे म्हणुन मी दि. २०/१०/२०१५ रोजी सहा.आयुक्त, बृहन्मुंबई म.न.पा. 'एल' विभाग, कुर्ला (प) मुंबई येथे अर्ज दिला होता. माझे अर्जाप्रमाणे माझी झोपडी क्रमांक टी/१९५६ ही पात्र झोपडी करणेकरीता, मी बृहन्मुंबई म.न.पा.'एल' विभाग कार्यालयातील संबधीत अधिकारी यांना वेळोवेळी भेटलो. पण मला कोणीही प्रतिसाद मिळाला नाही.

त्यांनतर सन २०१७ मध्ये मनपा अतिक्रमण विभागाने मी राहत असलेल्या ठिकाणी कारवाई करुन माझी नमुद झोपडी तोडली आहे. मला राहण्यास दुसरे घर नसल्याने मी सदर ठिकाणी मागील ३ वर्षापासुन प्लास्टीक पेपरची कच्ची झोपडी करुन कुटुंबासह राहत आहे. मला आज पावेतो मनपा बृहन्मुंबई कडुन राहण्यास घर मिळाले नाही.

मी दि. ३०/०३/२०२१ रोजी 'एल' विभाग, कुर्ला अंतर्गत पाईपलाईन चौकी, साकीनाका, मुंबई येथील क्लार्क श्री. परब साहेब यांना झोपडी पात्र करण्याकरीता भेटलो असता, त्यांनी माझेकडे ३,००,०००/ रुपये लाचस्वरूपात व चाळीस हजार रूपये शासकिय शुल्क असे दिल्यानंतरच माझी झोपडी पात्र ठरवुन त्याबदल्यात मला दुसरा फ्लॅट मिळेल असे सांगीतले. तसेच पैसे तयार झाले नंतर फोन करुन परब साहेबांनी मला भेटण्यास बोलावले आहे. त्यांनी मागणी केलेली ३,००,०००/– रू. ही कोणतीही शासकिय शुल्क नसल्याने व त्यांना लाच देण्याची .माझी ईच्छा नसल्याने मी दि.०५/०४/२०२१ रोजी नमुद अधिकारी यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधंक विभाग मुंबई येथे समक्ष हजर राहुन तक्रार अर्ज दिला होता.

मी दिलेल्या तक्रार अर्जावरुन पो.नि. कारभारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी दोन शासकिय पंचासमक्ष दि.०६/०४/२०२१ व दि ०७/०४/२०२१ रोजी दोन वेळा पडताळणी केली आहे. पंचासमक्ष श्री परब साहेब यांना फोन केला असता त्यांनी मला पवई येथे भेटण्यास बोलवले परंतु श्री. परब साहेब हे कोविड सेंटरमध्ये डयुटीकरीता असल्याने दोन्ही वेळेस मला त्यांची प्रत्यक्ष भेट घेता आली नाही.

त्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी दि.१८/०६/२०२१ श्री. परब साहेब मला त्यांचे साकीनाका येथील कार्यालयात भेटले तेंव्हा त्यांनी पुन्हा माझेकडे ३,००,०००/ रुपयाची मागणी केली व दि. २१/०६/२०२१ रोजी पैसे घेवुन भेटण्याकरीता पवई येथील कार्यालयात येण्यास सांगीतले असल्याने मी तशी माहिती देण्याकरीता लाचलुचपत कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. तेथील पो.नि. श्री. कारभारी साहेब यांनी मला दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पोलीसांनी त्यांची कार्यवाही पुर्ण केल्यानंतर मी, दोन पंच व पोलीस पथक असे पडताळणी करीता लाचलुचपत कार्यालय, वरळी, मुंबई येथून पोलीस वाहनातून रवाना झालो.

आम्ही स्टेट बॅक ऑफ इंडिया, साकीनाका येथे आल्या नंतर पोलीसांची वाहने थांबली. पो.नि. श्री. कारभारी साहेब यांनी मला व पंचांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करून त्यांनी माझे शर्टाचे आतिल बनियानला पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच श्री. पाटील याचेसह मला श्री परब यांचे कार्यालयात जावून

भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच असे श्री परब साहेब यांचे कार्यालयात गेलो. तेव्हा त्यांचे समोर इतर तीन ते चार व्यक्ती बसल्या असल्याने ते माझ्याशी काहीही बोलले नाहीत व इशारा करुन बाहेर थाबण्यास सांगीतले. त्या प्रमाणे मी व पंच बाहेर थांबलो असता काही वेळानंतर श्री. परब साहेब हे त्या कार्यालयाचे बाहेर आले व **त्यांनी माझे सोबत असलेल्या व्यक्तीकडे पाहुन हे सोबत कोण आहे ? असे विचारले तेव्हा मी त्यांना सांगीतले की, तो माझा मित्र आहे, त्यावेळी त्यांनी सांगीतले की तिसरा व्यक्ती असेल तर मला भेटण्यास यायचे नाही, त्याला ईथुन पाठव नाहीतर तुझे काम होणार नाही,** असे बोलल्याने मी तेथुन पंचासह निघुन पोलीस वाहने जेथे थांबली होती त्याठिकाणी आलो व श्री परब यांच्याशी झालेल्या संभाषणाबाबत पो.नि.कारभारी यांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. श्री. कारभारी यांचे सुचने प्रमाणे काही वेळा नंतर मी एकटा श्री. परब यांना त्यांचे कार्यालयात भेटलो व त्यांचेकडे कामा विषयी चौकशी केली असता त्यांनी मला सांगीतले की, **"३ लाख लेके आव बोला था तुमको .. पुरा ३ और ४० ट्रान्सफर का अलग ... कल मिलने आना"** असे म्हणुन माझेकडे ३ लाख रुपयाची लाच मागणी करुन उदया भेटण्यास बोलावले.

पो.नि. श्री. कारभारी यांनी दि.२२/०६/२०२१ रोजी ११.०० वाजता वरळी कार्यालयात बोलाविल्याने मी हजर झालो. त्यानंतर पोलीसांनी कार्यालयातील सापळा कार्यवाहीची प्रक्रिया पुर्ण करुन मी, दोन पंच व पोलीस पथक असे लाचलुचपत कार्यालय, वरळी, मुंबई येथून पोलीस वाहनातून रवाना झालो. आम्ही कालच्या ठिकाणी पोहचल्यानंतर पो.नि. कारभारी यांचे मला व पंचांना सुचना व मार्गदर्शन करून माझे बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावून एका पंचासह मला श्री परब यांचे पवई येथील कार्यालयात भेटण्यास पाठविले. मी तेथे गेलो असता तेथील कार्यालयात हजर नसल्याने तेथील एक व्यक्तीस विचारले असता त्यांनी श्री. परब साहेब हे एल वॉर्ड कुर्ला येथील कार्यालयात गेल्याची माहिती दिली. त्याबाबत मी पो.नि. कारभारी यांना सांगितले.त्यानंतर आम्ही सर्व एल वार्ड,कुर्ला याठिकाणी पोलीस वाहनाने रवाना झालो. डॉ देसाई नर्सिंग होम,बर्वे मार्ग,कुर्ला (प) येथे पोलीस वाहने थांबली.त्यानंतर पो.नि.कारभारी यांच्या सुचनेप्रमाणे मी श्री परब यांना भेटण्याकरीता एल वार्ड, कुर्ला येथील कार्यालयातील पाहिल्या मजल्यावर गेलो. तेथे श्री. परब साहेब मला भेटले व त्यांनी पैश्याबाबत माझेकडे चौकशी केली असता मी पैसे आणल्याचे त्यांना सांगीतले. त्यानंतर त्यांनी माझी झोपडी पात्र करण्याचे कामाची फाईल शोधुन काढली व मला त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडे घेवुन गेले. तेथे गेल्यावर वरिष्ठ अधिकारी श्री मालवणकर यांनी माझे कामाची फाईल पाहीली व मला सांगीतले की, **"तुझ्या फाईलची कागदपत्रे ही सोनार या व्यक्तीच्या नावाची आहेत. त्यामुळे तुझे काम होणार नाही"**. त्यानंतर श्री परब यांनी मला त्यांचे कार्यालयात नेवून, **"साहेबांनी तुझे काम होणार नाही असे सांगीतले आहे, तुझेकडुन पैसे घेवुन उपयोग नाही, आता तु जावु शकतोस, नंतर बघु,"** असे म्हणुन श्री. परब साहेब यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम न स्वीकारता मला जाण्यास सांगीतले. त्यानंतर श्री परब यांना मी पुन्हा भेटलो नाही.

यातील लोकसेवक श्री परब यांनी माझे झोपडी क्रमांक टी/१९५६ ही झोपडी पात्र करण्यासाठी दि.२१/०६/०२१ रोजी ३,००,०००/ रुपयाची लाचेची मागणी केली. परंतु दि. २२/०६/२०२१ रोजी **" आवश्यक कागदपत्रे नसल्याचे कारण सांगुन माझे काम होणार नाही नंतर बघू "** असे बोलुन लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्वीकारली नाही. तरी लोकसेवक श्री परब यांनी लाचेची मागणी केली म्हणुन आज रोजी मी त्याचे विरूध्द कायदेशीर तक्रार देत आहे.

माझा श्री. परब यांचेशी कोणताही आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार नाही किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब पो.नि. राहुल कारभारी यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो तो मला मराठीत वाचुन हिंदीतुन समजावुन सांगीतला,तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( राहुल कारभारी )
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............................................................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ............................................................

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता.वेळ व ठिकाणी आरोपी परब (लिपीक) मनपा यांने तक्रारदार यांचे अपात्र झोपडे पात्र करुन त्याबदल्यात पक्के घर देण्याच्या मोबदल्यात दि. २९।०६।२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान रु.3,00,000/- रक्कमेची लाचेची मागणी केली म्हणुन आरोपी यांचे विरुद्ध कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

..............................................................................................................................................

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ..............................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..............................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................, जिल्हा ................., राज्य .................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No...............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..............................................
पदनाम Rank..............................................
तपासिक अं. चा कोड क्र. ..............................
Posting
Code No. of I. O. ..............................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**